सहाय्यक पोलीस आयुक्त, वाहतुक औरंगाबाद यांचे कार्यालय.
Office of the Assistant Commissioner of Police (Traffic), Aurangabad City
( निशा प्राईड इमारत, मोंढानाका, जालना रोड, औरंगाबाद शहर )
दुरध्वनी क्रमांक - ०२४०-२२४०५४६ email- acptraff.abad@mahapolice.gov.in

जा.क्र.सपोआ/वाहतूक/Traffic Congestion/ Hotspot/२०२२-987 औरंगाबाद शहर दिनांक :- 10/08/२०२२.

प्रति,

मुख्य उद्यान अधिकारी,
महानगरपालिका, औरंगाबाद

विषय :- महानगरपालिका क्षेत्रातील Traffic Congestion/ Hotspot संदर्भात केलेल्या उपाय योजनाची माहीती बाबत.

संदर्भ :- जा.क्र. मनपा/उद्यान/२०२२- ४५३ दिनांक १८/०७/२०२२ अन्वये.

---***---

उपरोक्त विषय व संदर्भान्वये, राष्ट्रीय शुध्द हवा कार्यक्रमांतर्गत १५ व्या वित्त आयोगातुन औरंगाबाद महानगरपालिकेस योजनेच्या प्रकल्प सल्लागाराच्या मार्फत केंद्रीय प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या (CPCB) मार्गदर्शक तत्वानुसार त्यांना Micro Action Plan तयार करण्यासाठी Traffic Congestion/ Hotspot स्थळांची माहीती आपल्या कार्यालयास कळविण्यात आली होती. उक्त स्थळावर वाहतूकीची कोंडी कमी करण्यासाठी व वाहतूक सुरळीत होणेसाठी वाहतूक विभागाने काय उपाय योजना केल्या आहेत? याबाबत सविस्तर माहीतीची मागणी केली आहे. तरी सदर माहीती खालील प्रमाणे कळविण्यात येत आहे.

१) जळगाव टी, वसंतराव नाईक चौककडुन येणारी वाहतूक रामगिरी चौक पासुन सिडको बसस्टॅण्डकडे जाणारे वाहतूक बॅरिकेटस् टाकुन वळविण्यात आली आहे.
२) रामगिरी चौककडुन येणारी वाहतूक यु टर्न करुन मा.हायकोर्टकडे जाणारी वाहतूक कोन व बॅरिकेटस् लावुन तेथील वाहतूक Free Flow ठेवला आहे व तेथील सिग्नलचे टायमिंगमध्ये बदल केला आहे.
३) एन-१ सिग्नल येथील सर्व्हीस रोड बॅरिकेटींग टाकुन बंद केला आहे. तसेच प्रोझानकडुन कॅनॉटकडे येणा-या रोडवर Bollards बसविले आहे.
४) आंबेडकर चौककडुन जाधवमंडीकडे जाणा-या रोडवर Bollards बसविले तसेच बॅरिकेटींग केली आहे.
५) मुकुंदवाडी सिग्नल बॅरिकेटस् लावुन तेथील एक सिग्नल Free Flow केला आहे. तसेच तेथुन चिकलठाणाकडे जाणा-या रोडवर Bollards बसविण्यात आले आहे.
६) रामा हॉटेल समोरुन मा.हायकोर्टाकडे जाणारी सरळ वाहतूक बॅरिकेटींग केली आहे.
७) सेव्हन हिल येथील पेट्रोलपंप समोर रॉग साईटने येणारे वाहने बॅरिकेटिंग करुन वाहतूक बंद केली आहे.
८) बाराभाई ताजिया, रेल्वेस्टेशन येथे लोखंडी बॅरिकेटसच्या सहाय्याने दुभाजक तयार करुन ऐकरी वाहतूक नियमन केले जात आहे.
९) बीड बाय पास रोडवर असलेले खड्डे मुरुम टाकुन बुजवुन घेतले आहे. तसेच अरुंद रस्त्याचे रुंदीकरण करुन घेतले.
१०) मिलकॉर्नर ते बारापुल्ला गेट दरम्यान झालेले अतिक्रमण म.न.पा. अतिक्रमण पथकाच्या मदतीने काढुन रोड मोकळा केला व वाहतूक सुरळीत केली आहे.

महत्वाचे
फा०चांडउ
सकाली

Manpa- 2021. L

आ.क्र.मनपा/उद्यान/ 914
आवक दि. 29-08-2022
जावक दि.........

११) बाबा पेट्रोलपंपाकडे नाशिक पुणे रोड कडे येणारी वाहतूक व बस स्टॅण्डकडे जाणारी वाहतूक ही सुरळीत व्हावी म्हणुन म.न.पा. अतिक्रमण पथकाच्या मदतीने अतिक्रमण काढुन वाहनांसाठी मार्ग मोकळा करुन घेतला.

१२) पंचवटी चौक येथील बस स्टॉप लगत असलेल्या रिक्षा चालकांचना मोकळ्या जागेत रिक्षा पार्क करण्याबाबत सुचना दिल्या आहेत. तसेच छावणी व मिलींद चौक या रोडवरील वाहतूक सुरळीतव व्हावी म्हणुन वाहतूक अडथळा करणा-या चहा टपरी, पानटपरी, बिर्याणी हाऊस व चायनीस हातगाड्या छावणी परिषद अतिक्रमण विभागाच्या वतीने काढुन घेवुन वाहतूक कोंडी टाळण्यासाठी प्रयत्न केले आहे.

१३) जालना रोडवरील आकाशवाणी, अमरप्रित चौक या ठिकाणी वाहतूकीची कोंडी कमी करण्यासाठी व वाहतूक सुरळीत होणेसाठी लोखंडी बॅरिकेटसच्या सहाय्याने दुभाजक तयार करुन एकेरी वाहतूक नियमन केलेले आहे.

१४) Traffic Congestion/ Hotspot असे स्थळ असलेले मार्गावर Bollards बसविलेले आहेत. त्यामुळे वाहतूकीची कोंडी कमी होवुन वाहतूक नियमन सुरळीत होण्यास मदत झालेली आहे.

१५) Traffic Congestion/ Hotspot असलेल्या मार्गावर दुभाजक टाकणे, गतिरोधक/रम्बलर स्ट्रीप बसविणे, गतिरोधकांवर पांढरे पट्टे मारणे, झेब्रा क्रॉसींग, कॅटआईज बसविणे, सिग्नल बसविणे व त्यांची दुरुस्ती, खराब रस्त्यांची दुरुस्ती करणे व नवीन रस्ते तयार करणे, ज्या नवीन रस्त्यांचे काम सुरु आहे ते लवकरात लवकर पुर्ण होणे करीता, उड्डाणपुलाच्या खाली मोकळ्या जागेत जाळ्या बसविणे, उड्डाणपुळाखाली असलेल्या बेटांचा व्यास कमी करणे या उपाय योजनासाठी संबधीत विभागाशी पत्रव्यवहार करुन काही बाबींची पुर्तता करुन घेतली असुन उर्वरित बाबींची पुर्तता करुन घेत आहोत.

**(विशाल शरद दुमे)**
सहायक पोलीस आयुक्त,वाहतुक
औरंगाबाद शहर.

Manpa- 2021. L